# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

## अपील क्र. MHSICMU/२०२३/M/००३२७८

**अपिलार्थी श्री. निलेश बी. जोगबंशी**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यासन अधिकारी (का.क्र.१२)**
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई-४०० ००१

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपसहायक (विभागीय चौकशी)**
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई-४०० ००१

**<u>व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २१.०४.२०२५</u>**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | अनुपस्थित (ट्रकिंग रिपोर्ट नुसार दि. ०५.०४.२०२५ रोजी नोटीस प्राप्त झाली आहे) |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | उपस्थित |

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| १९.०७.२०२३ | १६.०४.२०२५ | २४.०८.२०२३ | १७.०४.२०२५ |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. ३०.१०.२०२३ रोजीच्या अर्जान्वये योग्य माहिती मिळालेली नाही असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

अपिलार्थी यांनी दि. १९.०७.२०२३ रोजीच्या माहिती अर्जानुसार दि. २१.०४.२०२३ रोजीच्या माहिती अधिकार अर्ज मध्ये मागणी केलेली आवश्यक माहिती मुदतीत प्राप्त न झाल्याने दि. ०१.०६.२०२३ रोजी प्रथम अपिल अर्ज सादर केला असून त्यासंबंधित पुढील माहिती मिळणेबाबत – १) प्रथम अपिल अर्जाची साक्षांकित प्रत २) टिपण्णीच्या साक्षांकीत प्रती ३) पत्रव्यवहाराच्या साक्षांकीत प्रती ४) सदर प्रथम अपील अर्जावर कार्यवाही न करणे संबंधित शासन निर्णय, परिपत्रक इ. ची माहिती विचारली होती. जन माहिती अधिकारी यांनी कोणतेही उत्तर न दिल्याने अपिलार्थी यांनी दि. २४.०८.२०२३ रोजी प्रथम अपिल दाखल केले.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित असून जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. १७.०४.२०२५ रोजीचे लेखी निवेदन आयोगासमोर सादर करुन असे नमूद केले की, जन माहिती अधिकारी यांनी दि. १६.०४.२०२५ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी

..२/-

दि.१७.०४.२०२५ रोजी प्रथम अपिलाची सुनावणी आयोजित केली होती. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. १७.०४.२०२५ रोजीच्या आदेशान्वये अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती त्यांना प्राप्त झाली आहे व ते समाधानी आहेत असे नमूद करुन प्रथम अपिल निकाली काढलेले आहे.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना माहिती दिलेली आहे. सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**अपिल निकाली काढण्यात येत आहे**

**मुंबई**
**दिनांक : २२.०४.२०२५**

State Information Commission Greater Mumbai

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**